सकाळ

सकाळ

पुणे, ★ गुरुवार, ९ एप्रिल २०२० SakalNews | @esakalupdate | www.esakal.com | Call Center : 9225800800




# जीवनावश्यक वस्तूंच्या तीनशे किटचे वाटप

जामखेड, ता. ८ : लॉक डाऊनमुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. तहसीलदार विशाल नाईकवाडे व आमदार रोहित पवार यांच्या संकल्पनेतून पुण्यातील मुकुल माधव संस्था, सेंटर फॉर यूथ डेव्हलपमेंट संस्थेच्या संस्थापक प्रिया कोठारी व कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्थेने जीवनावश्यक वस्तूंच्या १६ किलोच्या ३०० किटचे वाटप केले.

डाळ, तांदूळ, तेल, आटा, साखर, चहापावडर, मीठ, मसाला, पोहे, बिस्किटे, साबण अशा वस्तूंचा किटमध्ये समावेश आहे. किटचे वितरण करताना मुकुल माधव संस्थेच्या रितू छाबडिया, सेंटर फॉर यूथ डेव्हलपमेंटच्या प्रिया कोठारी, कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्थेचे पदाधिकारी, तसेच तहसीलदार विशाल नाईकवाडे, सुनील कोठारी, नवनाथ जावळे, संदेश कोठारी उपस्थित होते.

> **जमावबंदी, सामाजिक अंतर, अशा सूचनांचे पालन करा. मतदारसंघातील स्थानिक प्रशासनाच्या सहकार्यामुळे अडचणी दूर झाल्या. मिळालेल्या मदतीचे योग्य नियोजन करण्यात येत आहे.**
> **- रोहित पवार, आमदार**